दिनांक १५/७/२०१९

**प्रेस नोट**

**भरोसा सेल अंतर्गत विशेष बाल सुरक्षा पथकाकडुन विधीसंघर्षित बालकांचे परिणामकारक समुपदेशन**

मा. श्री. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे संकल्पनेतुन भरोसा सेलची दिनांक ९ जानेवारी २०१९ रोजी स्थापना होवुन मा. मुख्यमंत्री महादेय, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते उदघाटन करणेत आले आहे. ज्यामध्ये विशेष बाल सुरक्षा विभाग कार्यरत असुन विधीसंघर्षित बालकांचे समुपदेशन करुन त्यांना गुन्हेगारीपासुन परावृत्त करुन समाजाचे मुख्य प्रवाहात आणणेसाठी वेगवेगळे प्रयत्न करणेत येत आहेत.

मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांचे मार्गदर्शन व सुचनांनुसार विशेष बाल सुरक्षा विभागाचे पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक श्री. बाळासाहेब भोर, पो.हवा. शरद देडगे, अविनाश पवार, जर्नादन केदार, पो.हवा. उमेश आटोळे, विजय देशमुख, मयुर दळवी यांचे पथकाने तसेच लाईफ स्कुल फाऊंडेशन, कोरेगाव पार्क पुणे या स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष श्री. नरेन घोडीयाल तसेच समुपदेशक सदस्य श्री. अमित वरदे, श्री. पंकज पिपाडा, श्री.डॉ. प्रिती पुरोहीत, श्री. नरेश गांधी व श्री. राजेश शेट्टी यांनी व पंख फाऊंडेशनचे समुपदेशक स्मिता आपटे, मिना चितळे,ज्योती काटीकर, श्वेता सुर्यवंशी असे एकत्रित मिळुन काम करीत आहेत. ज्यामध्ये पोलीस स्टेशन स्तरावर २५ बैठका विभागीय सहाय्यक पोलीस आयुक्त स्तरावर ०९ बैठका अशा एकुण ३४ बैठका घेवुन त्यामध्ये एकुण ४५७ विधीसंघर्षित बालकांना व सदर विधीसंघर्षित बालकांचे १३५ पालंकाना समुपदेशन करणेत आले.

विधीसंघर्षित बालकांना गुन्हेगारी मानसिकतेतुन बाहेर पडणेकरीता, चांगले मित्र, शिक्षण, याचे महत्व त्यांना विशद करुन सांगणेत आले आहे. विधीसंघर्षित बालकांचे पालकांना देखील त्यांचे स्वतःचे राहणीमान, सामाजिक दर्जा सुधारणेसाठी व दारु व तत्सम व्यसनाधीनता टाळुन त्यांचे बालकांकडे त्यांचे शिक्षणाकडे लक्ष वेधणेबाबत समुपदेशन करणेत आले.

तसेच ज्या पालकांना आपली अल्पवयीन मुले/मुली घरात व्यवस्थित वागत नाहीत शिक्षण घेत नाहीत, मोबाईल व व्यसनांचे अधीन झाले आहेत अशा समस्या आहेत, अशा अल्पवयीन मुलांना समुपदेशनाकरीता भरोसा सेल अंतर्गत विशेष बाल सुरक्षा पथकात घेवुन आलेले एकुण-७० बालकांच्या अडचणी समजावुन घेवुन त्यांना योग्य ते समुदेशन करणत आलेले आहे.